# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.04.2025** **वार- सोमवार**

---

**<u>रुपाली चाकणकर</u>**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या गर्भवतीच्या मृत्याला रुग्णालयंच जबाबदार असल्याचं चौकशी समितीच्या अहवालातून समोर आलं आहे; अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आज पुण्यात दिली. पुण्यातील गर्भवती मृत्यू प्रकरणी, चाकणकर यांनी पुणे पोलिस आयुक्तालयात बैठक घेतली. या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, आरोग्य उपसंचालक यालाप्पा जाधव यांच्यासह ससून रुग्णालयातील अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने रुग्णाची वैयक्तिक माहिती प्रसारित केली; याबाबत रुग्णालयाला समज देण्यात येईल, असं चाकणकर म्हणाल्या. या प्रकरणी माता मृत्यू अन्वेषण समिती आणि धर्मादाय आयुक्त यांचा अहवाल अजून यायचा आहे; या समित्यांचे अहवाल आल्यानंतर रुग्णालयावर योग्य कारवाई करण्यात येईल असं चाकणकर म्हणाल्या.

दरम्यान दीनानाथ रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर धनंजय केळकर यांनीही काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. या प्रकरणाशी संबंधित डॉक्टरांनी राजीनामा दिला आहे; येत्या गुरुवारपर्यंत ते सेवामुक्त होतील, असं केळकर म्हणाले. रुग्णाकडून किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून आगाऊ रक्कम घेण्याचं धोरण

रुग्णालयानं रद्द केलं आहे; तसंच या प्रकरणानंतर, रुग्णाशी संवेदनशीलतेनं वागण्याबाबत रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना आम्ही प्रशिक्षण देणार आहोत, असं डॉक्टर केळकर यांनी सांगितलं.

**अ‍ॅग्रीहॅकॅथॉन**

देशातली पहिली आंतरराष्ट्रीय अ‍ॅग्री हॅकॅथॉन येत्या जून महिन्यात पुण्यात आयोजित करण्यात येणार आहे. या हॅकॅथॉनच्या संकेतस्थळाचं उद्घाटन उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुण्यात विधानभवनात नुकतंच करण्यात आलं. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली. ही स्पर्धा जिल्हा प्रशासन, कृषी विभाग, कृषी महाविद्यालय पुणे आणि आत्मा यंत्रणा यांनी संयुक्तपणे आयोजित केली आहे. स्पर्धकांना www.puneagrihackathon.com या संकेतस्थळावर येत्या ५ मे पर्यंत अर्ज करता येतील. शेतीतील विविध समस्यांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना शोधून, त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अ‍ॅग्री हॅकॅथॉनची मदत होणार आहे.

**मिळकतकर**

पुणे महापालिकेतर्फे येत्या एक मे पासून २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मिळकत करांच्या देयकांचं वाटप केलं जाईल अशी माहिती मिळकतकर विभागाच्या प्रमुख प्रतिभा पाटील यांनी दिली. पुणे शहरातील निवासी मिळकतींना मिळकत करामध्ये ४० टक्के सवलत देण्यासाठीच्या पीटी थ्री फॉर्मच्या नोंदी रखडल्याने, एप्रिलपासून मिळकत कराची देयके वाटप करणे अशक्य आहे; ३० जूनपर्यंत बिल भरणाऱ्या मिळकत  धारकांना सर्वसाधारण करामध्ये पाच टक्के सवलत देण्यात येईल असं पाटील यांनी सांगितलं.

**लक्झरीबस**

खासगी प्रवासी बस वाहतुकीविरोधात पुणे शहर वाहतूक पोलिसांनी अन्यायकारी कारवाईचा बडगा सुरू केला असल्याचा आरोप, पुणे डिस्ट्रिक्ट लक्झरी बस असोसिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब खेडेकर आणि

पदाधिकाऱ्यांनी आज पत्रकार परिषदेत दिला. याविरोधात येत्या १० एप्रिल पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा असोसिएशननं दिला आहे.

**<u>कृतीसमिती</u>**

शासनाने माथाडी कायद्यात काही दुरुस्त्या केल्या आहेत. मात्र, हमाल, तोलणार अशा कष्टकऱ्यांवरील अन्यायकारक दुरुस्त्या रद्द न केल्यास राज्य माथाडी हमाल कृती समितीकडून राज्यव्यापी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राज्य माथाडी हमाल कृती समितीनं दिला आहे. ज्येष्ठ कामगार नेते आणि राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉक्टर बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली कृती समितीची बैठक नुकतीच पुण्यात झाली; यामध्ये हा निर्णय घेण्यात आल्याचं नितीन पवार यांनी सांगितलं.

**<u>इथेनॉल</u>**

साखर कारखान्यांसाठी इथेनॉल उत्पादनाचं प्रगत तंत्रज्ञान हा एक महत्त्वाचा बदल आहे; त्याचा स्वीकार केला तर साखर कारखान्यांच्या महसूलात वाढ होईल, असं प्रतिपादन प्राज इंडस्ट्रीजचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर प्रामोद चौधरी यानी केलं. प्राज इंडस्ट्रीजच्या वतीने पुण्यात नुकतंच तांत्रिक कार्यशाळेचं आयेजन करण्यात आलं होतं; त्यावेळी ते बोलत होते.

**<u>मॅरेथॉन</u>**

साई जनसेवा प्रतिष्ठाननं महिलांच्या हाफ मॅरेथॉनचं म्हणजेच 'हिरकणी रन'चं आयोजन नुकतंच पुण्यात केलं होतं; तीन, पाच, दहा आणि २१ किलोमीटर अशा चार प्रकारात ही स्पर्धा पार पडली. यात रविना गायकवाड, ज्योती गवते, सपना सूर्यवंशी आणि निकिता गोविंद विजेत्या ठरल्या.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दुपारी उन्हाच्या तीव्र झळा जाणवत होत्या; कमाल तापमान ४१ अंश नोंदवलं गेलं. तर किमान तापमान १८ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमान साधारण आजच्या सारखंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**